गुरुवार दि. २० ऑगस्ट २०२६ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक ३४९ वा ● किंमत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

जविध्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता. जाफ्राबाद जि. जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल ॲण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL
टेंभुर्णी ता. जाफ्राबाद जि. जालना (मेन रोड)
एका छताखाली आरोग्य सेवा
डॉ. आनंद मान्ने Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

### जालना मनपातील ९९३ पदांच्या भरतीचा मार्ग मोकळा

# सेवा प्रवेश नियमावलीला शासनाची मंजुरी

## नगर विकास विभागाचा निर्णय; माजी आ. कैलास गोरंटयाल यांच्या पाठपुराव्याला यश



**जालना - प्रतिनिधी**

**जालना शहर महानगरपालिकेच्या स्थापनेनंतर अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या अधिकारी व कर्मचारी भरतीच्या प्रक्रियेला आता महत्त्वपूर्ण गती मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे. महानगरपालिकेतील मंजूर ९९३ पदांच्या आकृतिबंधानुसार सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण निश्चित करणाऱ्या नियमावलीला राज्य शासनाने मंजुरी दिली आहे. नगर विकास विभागाने बुधवार, १९ ऑगस्ट २०२६ रोजी यासंदर्भातील शासन निर्णय जारी केला. त्यामुळे जालना महापालिकेतील नियमित पदभरतीसाठी आवश्यक असलेल्या नियमावलीचा महत्त्वाचा टप्पा पूर्ण झाला असून, भरती प्रक्रियेचा मार्ग मोकळा झाल्याचे सांगितले जात आहे.**

**जालना शहर महानगरपालिका नव्याने स्थापन झाल्यानंतर महापालिकेचे प्रशासकीय कामकाज मोठ्या प्रमाणात वाढले आहे. मात्र, स्वतंत्र महानगरपालिकेच्या कामकाजासाठी आवश्यक असणाऱ्या मनुष्यबळाच्या तुलनेत उपलब्ध अधिकारी-कर्मचाऱ्यांची संख्या मर्यादित असल्याने विद्यमान कर्मचाऱ्यांवर कामाचा अतिरिक्त ताण पडत होता. विविध विभागांचे कामकाज प्रभावीपणे चालविण्यासाठी मंजूर पदांवर नियमित नियुक्त्या करण्याची आवश्यकता सातत्याने व्यक्त होत होती.**

**९९३ पदांचा आकृतिबंध आधीच मंजूर**

जालना शहर महानगरपालिकेसाठी राज्य शासनाने ११ सप्टेंबर २०२५ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे एकूण ९९३ पदांचा आकृतिबंध मंजूर केला होता. महानगरपालिकेचे वर्गीकरण आणि त्यानुसार आवश्यक अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या पदांची रचना लक्षात घेऊन हा आकृतिबंध निश्चित करण्यात आला. मात्र, केवळ पदांचा आकृतिबंध मंजूर झाल्याने भरती प्रक्रिया थेट सुरू करता येत नव्हती. संबंधित पदांसाठी सेवा प्रवेशाची पद्धत, शैक्षणिक पात्रता, अनुभव, पदोन्नती, सेवांचे वर्गीकरण तसेच नियुक्तीची प्रक्रिया निश्चित करणाऱ्या सेवा प्रवेश नियमांना शासनाची मान्यता मिळणे आवश्यक होते. आता या नियमावलीलाच मंजुरी मिळाल्याने भरतीच्या दृष्टीने महत्त्वाचा अडथळा दूर झाला आहे.

**सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण नियम २०२६ मंजूर**

राज्य शासनाने 'जालना शहर महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम, २०२६' या नियमांना मंजुरी दिली आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ मधील संबंधित तरतुदींनुसार हे नियम शासन मान्यतेसाठी सादर करण्यात आले होते.

महापालिकेने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५७ (३) अन्वये नियमावली शासनाकडे मंजुरीसाठी पाठविली होती. त्यासोबतच अधिनियमातील कलम ४५४, ४५५, ४५६, ४५७ (३) आणि ४६५ अन्वये नियमांना मान्यता देण्यात आली आहे. शासन निर्णयासोबत परिशिष्ट १ ते ४ मध्ये सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरणासंदर्भातील तरतुदींना मान्यता देण्यात आली आहे.

यामुळे महापालिकेच्या विविध विभागांतील पदांची नियुक्ती कोणत्या पद्धतीने केली जाईल, कोणत्या पदांसाठी कोणती पात्रता आवश्यक असेल आणि

कोणती पदे पदोन्नती अथवा थेट भरतीद्वारे भरली जातील, यासाठी प्रशासकीय चौकट निश्चित झाली आहे.

**गोरंटयाल यांच्या पाठपुराव्याला यश**

या निर्णयानंतर भाजपा नेते तथा माजी आमदार कैलास गोरंटयाल यांनी प्रतिक्रिया देताना हा निर्णय जालना महापालिकेच्या दृष्टीने महत्त्वाचा टप्पा असल्याचे सांगितले. त्यांच्या म्हणण्यानुसार, जालना महापालिकेतील कर्मचारी भरतीसाठी आपण सातत्याने पाठपुरावा केला होता.

गोरंटयाल यांनी सांगितले की, जालना शहर महानगरपालिका २२ ऑगस्ट २०२३ रोजीच्या अधिसूचनेन्वये नव्याने गठीत करण्यात आली. त्यानंतर ११ सप्टेंबर २०२५ रोजी ९९३ पदांचा आकृतिबंध मंजूर झाला. मात्र, सेवा प्रवेश नियमावलीला मंजुरी मिळणे बाकी असल्याने या पदांवर नियमित भरती करण्याची प्रक्रिया पुढे सरकत नव्हती.महानगरपालिका अस्तित्वात आल्यानंतर उपलब्ध मनुष्यबळाच्या माध्यमातूनच मोठ्या प्रमाणातील प्रशासकीय आणि नागरी सेवा सांभाळाव्या लागत होत्या. त्यामुळे अधिकारी-कर्मचाऱ्यांवर कामाचा अतिरिक्त ताण निर्माण होत असल्याचा मुद्दा गोरंटयाल यांनी शासनाच्या निदर्शनास आणून दिला होता.

**मुख्यमंत्री फडणवीसांकडेही पाठपुरावा**

गोरंटयाल यांच्या माहितीनुसार, भाजपाचे ज्येष्ठ नेते तथा माजी केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब पाटील दानवे, माजी मंत्री बबनराव लोणीकर, भाजपा जिल्हाध्यक्ष आ. नारायण कुचे, आ. संतोष दानवे तसेच आपण स्वतः मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे जालना महापालिकेतील कर्मचारी भरतीच्या प्रश्नासाठी सातत्याने पाठपुरावा केला.या पाठपुराव्याची दखल घेत मुख्यमंत्री फडणवीस यांनी नगर विकास विभागातील अधिकाऱ्यांना ९९३ मंजूर पदांसाठी आवश्यक सेवा नियमावलीला मंजुरी देण्याबाबत निर्देश दिल्याचे गोरंटयाल यांनी सांगितले. त्यानुसार नगर विकास विभागाने बुधवारी नियमावलीला मंजुरी दिल्याने महापालिकेतील पदभरतीचा मार्ग आता खुला झाल्याचा दावा त्यांनी केला.

**महापालिकेच्या कामकाजाला मिळणार बळ**

महानगरपालिकेत अधिकारी व कर्मचाऱ्यांची नियमित नियुक्ती झाल्यानंतर विविध विभागांवरील मनुष्यबळाचा ताण कमी होण्याची अपेक्षा आहे. शहरातील वाढती लोकसंख्या, नागरी सुविधा, पाणीपुरवठा, स्वच्छता, आरोग्य, बांधकाम परवानग्या, अतिक्रमण, मालमत्ता कर, नगररचना, अग्निशमन, अभियांत्रिकी आणि अन्य विभागांचे कामकाज प्रभावीपणे करण्यासाठी पुरेसे मनुष्यबळ आवश्यक आहे.

### पद भरतीची प्रक्रिया लवकरच करणार

जालना शहर महानगर पालिकेत सध्या विविध संवर्गातील जवळपास ४७५ कर्मचारी कार्यरत आहेत. कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांची सेवा ज्येष्ठता आणि शैक्षणिक पात्रता पडताळून पात्र असलेल्या कर्मचाऱ्यांना प्रथम पदोन्नती देण्याची प्रक्रिया जालना मनपातर्फे राबविण्यात येणार असून त्यानंतर लिपिक, कनिष्ठ अभियंता, वर्ग -४ यासह अन्य संवर्गातील कर्मचाऱ्यांची पदे सरळ सेवेद्वारे भरली जाणार असल्याचे माजी आमदार तथा भाजपा नेते कैलास गोरंटयाल यांनी सांगितले.

सध्या उपलब्ध कर्मचाऱ्यांच्या माध्यमातून महापालिकेचे कामकाज सुरू असताना अनेक विभागांवर अतिरिक्त जबाबदाऱ्या असल्याचे चित्र आहे. मंजूर आकृतिबंधातील पदे भरली गेल्यास विभागनिहाय मनुष्यबळ उपलब्ध होऊन प्रशासकीय कामकाज अधिक गतिमान होण्याची शक्यता आहे.

**आता पुढील प्रक्रिया महत्त्वाची**

शासनाने सेवा प्रवेश नियमावलीला मंजुरी दिल्यानंतर पुढील टप्प्यात मंजूर ९९३ पदांपैकी कोणती पदे प्रथम भरली जाणार, भरतीची पद्धत काय असेल, पदनिहाय पात्रता व आरक्षणाची अंमलबजावणी कशी केली जाईल आणि भरतीचे वेळापत्रक काय असेल, याकडे जालनेकरांचे लक्ष लागले आहे.

नियमावली मंजूर झाल्याने भरतीसाठी आवश्यक प्रशासकीय चौकट उपलब्ध झाली असली तरी प्रत्यक्ष नियुक्तीसाठी शासन व महापालिका स्तरावर आवश्यक पुढील प्रशासकीय कार्यवाही पूर्ण करावी लागणार आहे. त्यामुळे ९९३ पदांवरील भरतीची प्रक्रिया *(पान २ वर)*

## आमदार अर्जुनराव खोतकर यांनी पाठपुराव्याला यश मिळाल्याचा दावा; भाजप नेत्याचा पलटवार 'महापालिकेला विरोध करणाऱ्यांनी आता श्रेय घेऊ नये'

जालना शहर महानगरपालिकेतील विविध विभागांमधील मंजूर आकृतिबंधानुसार ९९३ पदे भरण्यास राज्य शासनाने प्रत्यक्ष मान्यता दिल्याचा दावा करण्यात आल्यानंतर जालना शहरातील राजकीय वातावरण तापले आहे. या निर्णयाचे श्रेय घेण्यावरून आमदार अर्जुनराव खोतकर आणि भाजप नेत्यांमध्ये आरोप-प्रत्यारोप सुरू झाले आहेत.

आमदार अर्जुनराव खोतकर यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे जालना महापालिकेतील ९९३ पदांच्या भरतीचा मार्ग मोकळा झाल्याचा दावा त्यांच्या समर्थकांकडून करण्यात आला आहे. दुसरीकडे, महापालिका निर्मितीला सुरुवातीपासून विरोध करणाऱ्या खोतकरांनी आता शासनाच्या निर्णयानंतर श्रेय घेण्याचा प्रयत्न करू नये, अशी टीका भाजपच्या एका नेत्याने केली आहे. त्यामुळे ९९३ पदांची भरती हा प्रशासकीय निर्णय असला तरी त्याचे राजकीय श्रेय कोणाचे?, असा सवाल आता चर्चेत आला आहे. जालना शहर महानगरपालिका स्थापन झाल्यानंतर महापालिकेच्या प्रभावी प्रशासकीय कामकाजासाठी आवश्यक मनुष्यबळ निश्चित करण्याच्या दृष्टीने ११ सप्टेंबर २०२५ रोजी ९९३ पदांचा आकृतिबंध मंजूर करण्यात आला होता.

मात्र, आकृतिबंध मंजूर झाल्यानंतरही संबंधित पदांवर थेट भरती करण्यासाठी सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण नियमांना शासनाची मंजुरी आवश्यक होती. १९ ऑगस्ट २०२६ रोजी नगर विकास विभागाने 'जालना शहर महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम, २०२६' मंजूर केले आहे. या निर्णयानंतर आमदार अर्जुनराव खोतकर यांच्या समर्थकांकडून त्यांच्या पाठपुराव्याला यश मिळाल्याचे सांगण्यात येत आहे. महापालिकेतील ९९३ जागा प्रत्यक्ष भरण्यास राज्य शासनाने मान्यता दिल्याने आता विविध विभागांतील रिक्त पदांवर नियुक्ती करण्याचा मार्ग खुला झाला असल्याचे खोतकर यांचे म्हणणे आहे. मात्र, या निर्णयाचे श्रेय खोतकरांनी घेण्यावरून भाजपच्या एका नेत्याने तीव्र प्रतिक्रिया दिली आहे.

'मुळात जालना महानगरपालिका होण्यास सर्वाधिक विरोध अर्जुन खोतकर यांनी केला. महानगरपालिका झाल्यानंतर जालना शहरातील नागरिकांमध्ये कर वाढीचे धोके आणि अन्य बाबींबाबत भीती निर्माण करण्यात आली. आता शासनाने ९९३ पदांना मान्यता दिल्यानंतर त्याचे श्रेय घेण्यासाठी खटाटोप सुरू आहे,' अशी टीका भाजप नेत्याने केली.

महापालिका स्थापनेच्या वेळी घेतलेल्या भूमिकेची आठवण करून देत आता त्याच व्यवस्थेतील पदभरतीचा निर्णय आपल्या पाठपुराव्यामुळे *(पान २ वर)*

### जालन्याच्या विकासासाठी महापौर वंदना मगरे, उपमहापौर राजेश राऊत यांची फडणवीसांकडे 'विकासपॅकेज'ची मागणी

# जीएसटी अनुदान वाढीसह १३७ कोटींच्या कामांसाठी निधीची मागणी

**जालना । प्रतिनिधी**

जालना शहर महानगरपालिकेच्या सक्षमीकरणासह शहरातील विविध विकासकामांना गती देण्यासाठी महापौर वंदना अरुण मगरे आणि उपमहापौर राजेश रामभाऊ राऊत यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे विविध मागण्यांचे निवेदन सादर केले आहे. महानगरपालिकेच्या आर्थिक स्थितीला बळकटी देण्यासाठी अनुदानात वाढ, रखडलेल्या सहाय्यक अनुदानातील फरकाची रक्कम, ९९३ पदांच्या सेवा प्रवेश नियमांना मंजुरी, नाट्यगृहाची पुनर्बांधणी, नवीन जालन्यात भव्य उद्यान, शहर परिवहन सेवा, सिना-कुंडलिका नदी संवर्धन आणि अत्याधुनिक इनडोअर स्टेडियम अशा एकूण नऊ प्रमुख मागण्या या निवेदनातून करण्यात आल्या आहेत.

दरम्यान, जालना महानगरपालिकेच्या ९९३ पदांच्या सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण नियमावलीला राज्य शासनाने बुधवारी, १९ ऑगस्ट रोजी मंजुरी दिली आहे. त्यामुळे निवेदनातील पहिल्या मागणीची पूर्तता झाल्याचे चित्र आहे. आता उर्वरित आर्थिक व विकासात्मक मागण्यांना शासनाकडून कितपत प्रतिसाद मिळतो, याकडे जालनेकरांचे लक्ष लागले आहे.

**भाजपच्या ४१ नगरसेवकांच्या पार्श्वभूमीवर विकासाचा अजेंडा**

निवेदनात नमूद केल्यानुसार, जालना महानगरपालिकेच्या पहिल्या सार्वत्रिक निवडणुकीत भारतीय जनता पक्षाचे ४१ नगरसेवक निवडून आले आहेत. शहरातील जनतेने भाजपच्या नेतृत्वावर विश्वास व्यक्त केल्याचा उल्लेख करत हा विश्वास विकासकामांच्या माध्यमातून सार्थ ठरविण्यासाठी प्रशासनाला आवश्यक आर्थिक व मनुष्यबळ उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात आली आहे.

महापालिका स्थापन झाल्यानंतर शहराचा विस्तार आणि वाढलेल्या नागरी गरजांच्या तुलनेत उपलब्ध मनुष्यबळ व आर्थिक स्रोत मर्यादित असल्याचा मुद्दाही निवेदनातून मांडण्यात आला आहे.

**दरमहा ₹१५ कोटी अनुदानाची मागणी**

महापालिकेच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी अनुदानात वाढ करण्याची मागणी निवेदनातील सर्वात महत्त्वाच्या मुद्द्यांपैकी एक आहे. निवेदनानुसार, मंत्रिमंडळाच्या २७ मे २०२५ रोजीच्या निर्णयानुसार जालना महापालिकेस पाच वर्षांसाठी ₹३९२ कोटींचा परतावा मंजूर करण्यात आला आहे. मात्र, जालना शहरातून राज्य शासनाला दरवर्षी प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरीत्या सुमारे ₹१,००० कोटींचा वस्तू व सेवा कर प्राप्त होत असल्याचा दावा निवेदनात करण्यात आला आहे. शहराचा वाढता विस्तार आणि वाढलेल्या नागरी सुविधांचा खर्च लक्षात घेता महापालिकेला दरमहा ₹१५ कोटी अनुदान देण्यात यावे, अशी मागणी करण्यात आली आहे. यासंदर्भातील प्रस्ताव आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, मुंबई यांच्यामार्फत शासनाकडे सादर करण्यात आल्याचे निवेदनात नमूद आहे.

दरमहा ₹१५ कोटींचे अनुदान मिळाल्यास महापालिकेला वर्षाला ₹१८० कोटींचे अनुदान प्राप्त होऊ शकते. त्यामुळे नियमित प्रशासकीय खर्चासह विकासकामांसाठी महापालिकेच्या आर्थिक क्षमतेत मोठी वाढ होण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.

**१९९९ ते २०२६ मधील ₹२७७ कोटींच्या फरकाची मागणी**

महापालिकेच्या आर्थिक प्रश्नातील आणखी एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे सहाय्यक अनुदानातील फरकाची रक्कम. निवेदनानुसार, जालना नगर परिषद असताना शासन निर्णयाप्रमाणे दरवर्षी सहाय्यक अनुदानात १० टक्के वाढ अपेक्षित होती. मात्र प्रत्यक्षात अपेक्षेप्रमाणे अनुदान मिळाले नसल्याने सन १९९९ ते २०२६ या कालावधीतील फरकाची तब्बल ₹२७७ कोटी रक्कम देण्याचा प्रस्ताव संचालक कार्यालयाकडे प्रलंबित आहे. सध्या महापालिकेला मिळणारे अनुदान जुन्या सहाय्यक अनुदानाच्या आधारावर निश्चित होत असल्याचा दावा निवेदनात करण्यात आला आहे. त्यामुळे ही फरकाची रक्कम मंजूर झाल्यास महापालिकेच्या विकासकामांसाठी *(पान २ वर)*

## आधी शेतरस्ते खुले केले, आता गरिबांच्या लेकरांच्या शाळा समृद्ध करणार!

*जिल्हा परिषद शाळांच्या सक्षमीकरणासाठी सतीश घाटगे यांचा पुढाकार! : पाथरवाला खुर्द येथील शाळा घेतली दत्तक*

**अंबड - प्रतिनिधी**

: ग्रामीण भागातील कष्टकरी, शेतकरी आणि सर्वसामान्य कुटुंबांतील विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा मजबूत आधार असलेल्या जिल्हा परिषद शाळा शेवटच्या घटका मोजत आहेत. या शाळा टिकवण्यासाठी अनेक गावांतील ग्रामस्थ स्वतः हून पुढे येत आहेत. त्यांच्या या प्रामाणिक प्रयत्नांना बळ देण्यासाठी समृद्धी साखर कारखान्याचे चेअरमन सतीश घाटगे पाटील यांनी पुढाकार घेतला आहे. शेकडो किलोमीटरचे शेतरस्ते खुले करणाऱ्या सतीश घाटगे यांनी आता जिल्हा परिषद शाळा सक्षम करण्याचे मिशन हाती घेतले असून, पाथरवाला खुर्द येथील जिल्हा परिषद शाळा त्यांनी दत्तक घेऊन शाळेला समृद्ध करण्याची घोषणा केली. पाथरवाला खुर्द येथील जिल्हा परिषद शाळेत आठवीपर्यंत वर्ग आहेत. या शाळेसाठी ग्रामस्थांनी लोकसहभागातून जमेल तेवढी मदत केली. गावकऱ्यांच्या या प्रयत्नांना पाठबळ देण्यासाठी सतीश घाटगे यांनी शाळेला भेट देत सोयी-सुविधांची पाहणी केली. यावेळी शिक्षक तसेच शाळेतील चिमुकल्या विद्यार्थ्यांशी संवाद साधून त्यांच्या अडचणी आणि गरजा जाणून घेतल्या. तसेच ग्रामस्थांच्या लोकसहभागातून आणि समृद्धी साखर *(पान २ वर)*

# संपादकीय...

## शपथ पुरेशी नाही; नशामुक्तीसाठी 'सिस्टम' बदलण्याची गरज!

जिल्हा परिषदेच्या सभागृहात अधिकारी-कर्मचाऱ्यांनी 'नशामुक्त भारत'ची शपथ घेतली. व्यसनांचे दुष्परिणाम सांगितले गेले. कालापथक आणि पथनाट्यातून व्यसनमुक्तीचा संदेश देण्यात आला. युवक आणि विद्यार्थ्यांनी व्यसनांपासून दूर राहावे, असे आवाहनही करण्यात आले. कार्यक्रमाच्या दृष्टीने हे निश्चितच स्वागतार्ह आहे. मात्र, या सगळ्यानंतर एक अस्वस्थ करणारा प्रश्न उभा राहतोशपथ घेऊन नशामुक्त भारत निर्माण होणार आहे का? उत्तर साहजिकच 'नाही' असेच आहे. शपथ ही सुरुवात असू शकते; पण ती शेवट असू शकत नाही. व्यसनमुक्तीची खरी लढाई घोषणांमध्ये नव्हे, तर अंमलबजावणीमध्ये जिंकावी लागणार आहे.

आज गुटखा, तंबाखूजन्य पदार्थ, सिगारेट, दारू किंवा इतर व्यसनाधीन पदार्थ सहज उपलब्ध होत असतील, तर केवळ युवकांना 'व्यसन करू नका' असे सांगून प्रश्न सुटणार नाही.

एका बाजूला जनजागृती आणि दुसऱ्या बाजूला सहज उपलब्धताही विसंगती दूर करावी लागेल.

विशेषतः शाळा-महाविद्यालयांच्या परिसरात प्रतिबंधित तंबाखूजन्य पदार्थांची विक्री, अल्पवयीन मुलांना होणारी विक्री, अवैध साठा आणि बेकायदेशीर विक्री यावर सातत्याने कारवाई होणे आवश्यक आहे. व्यसनाचा ग्राहक निर्माण होण्यापूर्वीच त्याच्यापर्यंत व्यसनाचा माल पोहोचू न देणे, हा नशामुक्तीच्या धोरणाचा पहिला नियम असायला हवा.

जिल्ह्यात गुटखा आणि पानमसाला विक्रीविरोधात अधूनमधून कारवाया होतात. काही ठिकाणी मोठ्या प्रमाणात साठे जप्त होतात. गुन्हे दाखल होतात. मात्र काही दिवसांनी परिस्थिती पुन्हा पूर्ववत होत असेल, तर या कारवायांचा प्रतिबंधात्मक परिणाम किती? नशामुक्त भारताची शपथ घेणाऱ्या प्रशासनाने स्वतःला एक प्रश्न विचारला पाहिजे. ज्या दुकानातून शाळकरी मुलाला सहज गुटखा मिळतो, ते दुकान प्रशासनाच्या नजरेतून कसे सुटते? कारवाई केवळ माल जप्त करण्यापुरती न राहता पुरवठा साखळीपर्यंत पोहोचली पाहिजे. छोट्या विक्रेत्यावर कारवाई करून मोठ्या पुरवठादारांना मोकळे सोडले तर व्यसनमुक्तीचे उद्दिष्ट कधीच साध्य होणार नाही. तंबाखू आणि गुटख्याच्या व्यसनापेक्षा अमली पदार्थांचा प्रश्न अधिक गंभीर आणि गुंतागुंतीचा आहे. युवक अमली पदार्थांच्या जाळ्यात अडकत असतील, तर केवळ पोलिस कारवाई पुरेशी नाही. पुरवठादार पकडणे जितके महत्त्वाचे, तितकेच व्यसनाधीन व्यक्तीला उपचार आणि पुनर्वसन देणेही महत्त्वाचे आहे. व्यसनाधीन व्यक्तीकडे केवळ गुन्हेगार म्हणून पाहण्याची मानसिकता बदलण्याची गरज आहे. काही प्रकरणांत ती व्यक्ती स्वतःही व्यसनाच्या साखळीत अडकलेली असू शकते. अशा व्यक्तीला समुपदेशन, वैद्यकीय उपचार आणि पुनर्वसनाची संधी मिळाली पाहिजे. युवकांना व्यसनांपासून वाचवायचे असेल तर शाळा आणि महाविद्यालयांनीही अधिक सक्रिय भूमिका घ्यायला हवी.

विद्यार्थ्यांना व्यसनांचे दुष्परिणाम सांगण्यासाठी वर्षातून एखादा कार्यक्रम घेणे पुरेसे नाही. त्यांच्या मानसिक आरोग्याशी, तणावाशी, कौटुंबिक वातावरणाशी आणि मित्रपरिवाराशी संबंधित प्रश्न समजून घेणारी समुपदेशन व्यवस्था आवश्यक आहे. कारण अनेकदा व्यसनाची सुरुवात 'फक्त एकदा करून पाहू' इथून होते; पुढे ती सवय बनते आणि शेवटी व्यसन.

म्हणूनच प्रतिबंधात्मक शिक्षण लहान वयात सुरू झाले पाहिजे. व्यसनमुक्तीच्या चर्चेत आपण सरकार, पोलिस, प्रशासन, शाळा आणि सामाजिक संस्थांचा उल्लेख करतो; पण सर्वांत महत्त्वाची संस्था म्हणजे कुटुंब. मुलांच्या वर्तनातील अचानक बदल, मित्रपरिवारातील बदल, आर्थिक गरजा वाढणे, अभ्यासात किंवा कामात अनास्था, चिडचिड, एकटेपणा यांसारख्या संकेतांकडे पालकांनी गांभीर्याने पाहिले पाहिजे.

'आपल्या मुलाला काही होणार नाही' हा अतिआत्मविश्वास धोकादायक ठरू शकतो. संवाद वाढवणे, विश्वासाचे वातावरण निर्माण करणे आणि गरज पडल्यास तज्ज्ञांची मदत घेणे ही पालकांची जबाबदारी आहे.

जिल्हा परिषदेत झालेल्या कार्यक्रमात कालापथक आणि पथनाट्यातून व्यसनांचे दुष्परिणाम मांडण्यात आले. ही जनजागृतीची प्रभावी पद्धत आहे. कारण आकडेवारीपेक्षा कथा, प्रसंग आणि भावनिक मांडणी अनेकदा मनावर अधिक परिणाम करते. पण प्रश्न आहेपथनाट्य पाहिल्यानंतर एखादा युवक व्यसन सोडू इच्छित असेल तर त्याला पुढे कुठे जायचे?

त्याच्यासाठी समुपदेशन केंद्र आहे का? उपचाराची सुविधा सहज उपलब्ध आहे का? कुटुंबाला मार्गदर्शन मिळेल का? पुनर्वसनानंतर रोजगाराची संधी मिळेल का?

या प्रश्नांची उत्तरे प्रशासनाकडे तयार असली पाहिजेत.

जिल्हा प्रशासनाने नशामुक्तीच्या अभियानाला मोजता येतील अशी उद्दिष्टे निश्चित करण्याची वेळ आली आहे.

उदाहरणार्थ, शाळा-महाविद्यालयांच्या परिसरात नियमित तपासणी, अल्पवयीनांना तंबाखूजन्य पदार्थ विक्रीवर कठोर कारवाई, अवैध गुटखा व तंबाखू पुरवठा साखळीवर कारवाई, अमली पदार्थांच्या तस्करीविरोधात गुप्त माहिती यंत्रणा मजबूत करणे, व्यसनाधीनांसाठी समुपदेशन व उपचार सुविधा, प्रत्येक तालुक्यात जनजागृती कार्यक्रम, युवकांसाठी क्रीडा, कौशल्य आणि रोजगाराभिमुख पर्याय, पालक व शिक्षकांसाठी व्यसन प्रतिबंध प्रशिक्षण अशी ठोस यंत्रणा उभी राहिली तरच 'नशामुक्त भारत' ही संकल्पना कागदावरून प्रत्यक्षात येऊ शकते. व्यसनमुक्ती म्हणजे फक्त व्यसन करणाऱ्याला दोष देणे नाही. युवकांना चांगले पर्याय उपलब्ध करून देणेही तितकेच आवश्यक आहे. क्रीडा, कला, शिक्षण, रोजगार, कौशल्य विकास, उद्योजकता आणि सकारात्मक सामाजिक सहभाग यांना प्रोत्साहन दिले तर युवकांची ऊर्जा योग्य दिशेने वळू शकते. म्हणून नशामुक्तीचा लढा हा केवळ आरोग्य विभागाचा किंवा पोलिसांचा विषय नाही. तो शिक्षण, समाजकल्याण, आरोग्य, क्रीडा, रोजगार आणि स्थानिक प्रशासन या सर्व विभागांचा संयुक्त विषय आहे. जिल्हा परिषदेतील अधिकारी-कर्मचाऱ्यांनी घेतलेली शपथ निश्चितच सकारात्मक आहे. पण त्या शपथेचे खरे मूल्य पुढील काही महिन्यांत दिसले पाहिजे.ज्या कार्यालयात शपथ घेतली जाते, त्याच प्रशासनाने व्यसनमुक्तीसाठी कठोर धोरण राबवले पाहिजे. ज्या मंचावर युवकांना व्यसनांपासून दूर राहण्याचे आवाहन केले जाते, तिथूनच व्यसनाचा पुरवठा करणाऱ्यांवर कठोर कारवाईचे आदेशही गेले पाहिजेत. पथनाट्य संपले, टाळ्या वाजल्या आणि कार्यक्रम संपलाइथेच नशामुक्ती थांबता कामा नये.

# 'फार्म टू फॉरेन' मोहिमेतून महाराष्ट्रातील कापड उद्योगाला मिळणार जागतिक झळाळी – उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

**मुंबई - प्रतिनिधी**

महाराष्ट्राच्या मातीत पिकलेला कापूस आणि त्यापासून तयार उत्पादने आता थेट परदेशातील मॉलमध्ये झळकरणार आहेत. कापूस उत्पादनापासून ते जागतिक फॅशन बाजारपेठेपर्यंतची साखळी अधिक बळकट करण्यासाठी राज्य सरकार कटिबद्ध असून, 'फार्म टू फॉरेन' संकल्पनेद्वारे महाराष्ट्र जागतिक एक्सपोर्ट हब होईल, असा विश्वास उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज येथे व्यक्त केला.

जिओ वर्ल्ड सेंटर येथे असोचेम आयोजित 'फार्म टू फॉरेन कॉन्क्लेव्ह २०२६' मध्ये ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. यावेळी असोचॅम महाराष्ट्र राज्य परिषदेचे अध्यक्ष मिलिंद हर्डीकर यांच्यासह अजय अरोरा, कार्तिक्य धंडा, वृंदा मनोहर देसाई, चिन्मयी देऊळगावकर, उद्योजक, धोरणकर्ते आणि जागतिक तज्ज्ञ उपस्थित होते.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'विकसित भारत २०४७' च्या स्वप्नाला बळ देण्यासाठी राज्य सरकार ' फाइव एफ' व्हिजनवर काम करत आहे. यामध्ये फार्म ते फायबर, फायबर ते फॅक्टरी, फॅक्टरी ते फॅशन आणि फॅशन ते फॉरेन असा प्रवास निश्चित करण्यात आला आहे. आपल्या शेतातील कापूस, रेशीम, जूट आणि फळांचे जागतिक ब्रँडिंग करणे, हे आमचे उद्दिष्ट असल्याचे उपमुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले. महाराष्ट्राची 'टेक्सटाईल हब' म्हणून ओळख तसेच मुंबईला आर्थिक राजधानीचा दर्जा मिळवून देण्यात कापड गिरण्यांचा मोठा वाटा होता. याच ऐतिहासिक वारशाला पुढे नेत, नागपूरचा पीएम मित्रा पार्क आणि अमरावती टेक्स्टाईल क्लस्टर राज्याच्या अर्थव्यवस्थेला नवी गती देतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, केवळ उत्पादन वाढवणे पुरेसे नाही, तर उत्पादन 'ग्रीन', 'डिजिटल' आणि 'पारदर्शक' असणे गरजेचे आहे. इचलकरंजी, सोलापूर, भिवंडीसह राज्यातील विविध भागांत 'रेडीमेड गारमेंट क्लस्टर्स' उभारले जात आहेत. तसेच, 'लाडकी बहीण' योजनेच्या माध्यमातून महिलांना आधुनिक शिलाई प्रशिक्षणाशी जोडून त्यांना स्वयंपूर्ण बनवण्याचे काम सुरू असल्याचे उपमुख्यमंत्र्यांनी सांगितले. महाराष्ट्राच्या पैठणी, कोल्हापुरी चप्पलयांसारख्या पारंपरिक उत्पादनांच्या जागतिक विस्तारासाठी सरकार विशेष प्रयत्नशील आहे.

भायखळा येथील ऐतिहासिक इंडिया युनायटेड मिलच्या जागेवर 'टेक्स्टाईल, क्राफ्ट अँड कल्चरल म्युझियम' उभारले जात आहे, जे राज्याच्या सांस्कृतिक वारशाची ओळख जगाला करून देईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

समृद्धी महामार्ग, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ आणि जेएनपीए बंदरामुळे आता राज्यातील उत्पादने काही तासांत जागतिक बाजारपेठेत पोहोचू शकतील, असे सांगत त्यांनी उद्योजकांना महाराष्ट्रात गुंतवणूक करण्याचे आवाहन केले. कापसापासून बनलेल्या धाग्यांतून आपण केवळ कपडे नाही, तर विकसित भारताचे भविष्य विणत आहोत. लवकरच लंडन, न्यूयॉर्क आणि पॅरिसच्या फॅशन शोरूम्समध्ये 'मेड इन महाराष्ट्र'चे टॅग दिसेल, असा निर्धार उपमुख्यमंत्र्यांनी यावेळी व्यक्त केला.

### सचिन अंदुरे यांना दाभोलकर हत्या प्रकरणात उच्च न्यायालयात जामीन मंजूर !

# ... हा तर सत्याचा विजय ! – सनातन संस्था

मुंबई - डॉ. नरेंद्र दाभोलकर हत्या प्रकरणी जन्मठेपेची शिक्षा सुनावण्यात आलेले हिंदुत्वनिष्ठ सचिन अंदुरे यांना तपासातील गंभीर त्रुटी लक्षात घेऊन आज मुंबई उच्च न्यायालयाने जामीन मंजूर करत त्यांच्या शिक्षेला स्थगिती दिली आहे. न्यायमूर्ती सारंग कोतवाल आणि न्यायमूर्ती रणजितसिंह भोसले यांच्या खंडपीठाने हा महत्त्वपूर्ण निर्णय दिला. विशेष न्यायालयाने दिलेल्या शिक्षेच्या विरोधात अंदुरे यांनी उच्च न्यायालयात जामीन याचिका दाखल केली होती. अंदुरे यांच्या या याचिकेला विरोध करत दाभोलकर परिवाराने 'सचिन अंदुरे यांना जामीन देऊ नये', अशी मागणी करणारी स्वतंत्र याचिका दाखल केली होती, मात्र उच्च न्यायालयाने त्यांची ही मागणी स्पष्टपणे धुडकावून लावत अंदुरे यांना जामीन मंजूर केला. या निर्णयामुळे सनातन संस्थेवर आणि हिंदुत्वनिष्ठांवर खोटे आरोप करून त्यांना गोवण्याचे दाभोलकर कुटुंबियांचे षड्यंत्र आता उघडे पडले आहे; तसेच तपास यंत्रणांचा फोलपणाही उघड झाला असून हा सत्याचा मोठा विजय आहे, अशी भूमिका सनातन संस्थेचे प्रवक्ते श्री. अभय वर्तक यांनी मांडली आहे. उच्च न्यायालयामध्ये सचिन अंदुरे यांच्या जामिनासाठी युक्तिवाद करतांना ज्येष्ठ अधिवक्ता नितीन प्रधान यांनी पुराव्यांमधील त्रुटींवर बोट ठेवले. सीबीआयसारख्या देशातील सर्वोच्च तपास यंत्रणेने या प्रकरणात कोणतीही 'ओळख परेड' घेतली नव्हती. काहींनी सचिन अंदुरे यांना गोळ्या झाडतांना पाहिल्याचा दावा केला, तर काहींनी ते घटनास्थळी नसल्याचे सांगितले. अशा प्रकारे प्रत्यक्षदर्शी साक्षीदारांच्या जबाबात मोठी तफावत होती. या, तसेच तपासातील अशा प्रकारच्या अनेक त्रुटी अधिवक्त्यांनी न्यायालयाच्या निदर्शनास आणल्या. हे सर्व लक्षात घेऊन न्यायालयाने हा जामीन मंजूर केला व शिक्षेला स्थगिती दिली आहे. यापूर्वी याच प्रकरणात एप्रिल महिन्यात हिंदुत्वनिष्ठ युवक शरद कळसकर यांना उच्च न्यायालयाने जामीन संमत केला होता. या विषयी श्री. वर्तक पुढे म्हणाले की, दाभोलकरांच्या हत्येनंतर कोणत्याही ठोस पुराव्याविना केवळ वैचारिक द्वेषातून सनातन संस्थेला लक्ष्य करण्यात आले. दाभोलकर कुटुंबियांनी 'विशिष्ट विचारसरणीचा आवाज दाबण्याचा कट' असल्याचा कांगावा करत सनातनवर बेछूट आरोप केले; परंतु विशेष न्यायालयाने यापूर्वीच डॉ. वीरेंद्र तावडे, अधिवक्ता संजीव पुनाळेकर आणि श्री. विक्रम भावे या तीन हिंदुत्वनिष्ठांची निर्दोष मुक्तता केली होती. यामुळे दाभोलकर कुटुंबाचा न्यायालयात सपशेल पराभव झाला आहे. खऱ्या खुन्यांचा शोध घेण्यापेक्षा हिंदुत्ववाद्यांना अडकवण्याचाच त्यांचा हेतू होता, हे आता स्पष्ट झाले आहे. तसेच सचिन अंदुरे यांना अटक झाली तेव्हा त्यांची मुलगी केवळ ६ महिन्यांची होती. आता सचिन अंदुरे आपल्या मुलीला भेटतील तेव्हा ती आठ वर्षांची झाली आहे. सचिन अंदुरे यांना मुलीचे ते बालपण पुन्हा मिळणार नाही. त्यांची मुलगी वडिलांच्या ज्या सहवासाला मुकली, तो सहवास तिला पुन्हा मिळणार नाही. मोठमोठे राजकारणी, पोलीस अधिकारी, सिनेकलावंत यांच्याशी जवळीक असलेल्या कुटुंबासाठी एका निष्पाप हिंदू मुलाचा कसा बळी दिला जातो, याचे उत्तम उदाहरण म्हणजे सचिन अंदुरे! न्यायालयात अंदुरे यांच्या बाजूने लढा देणारे मुंबई उच्च न्यायालयाचे ज्येष्ठ अधिवक्ता नितीन प्रधान, अधिवक्ता शुभदा खोत, अधिवक्त्या सिद्धविद्या, हिंदु विधीज्ञ परिषदेचे राष्ट्रीय अध्यक्ष अधिवक्ता वीरेंद्र इचलकरंजीकर आणि त्यांच्या सर्व सहयोगी अधिवक्त्यांचे सनातन संस्था मनःपूर्वक आभार व्यक्त करते. अंतिम सुनावणीत हे दोन्ही हिंदुत्वनिष्ठ युवक निर्दोष मुक्त होतील, असा आम्हाला ठाम विश्वास आहे, असेही श्री. वर्तक यांनी म्हटले आहे.

**आपला नम्र,**
**श्री. अभय वर्तक,**
**प्रवक्ते, सनातन संस्था**
**(संपर्क : ९९८७९ २२२२२)**

पान १ व ४ वरुन...

## सेवा प्रवेश...

नेमकी कधी सुरू होते आणि पहिल्या टप्प्यात किती पदे भरली जातात, हे आगामी काळात स्पष्ट होणार आहे.

**हजारो इच्छुकांसाठी संधीची अपेक्षा**

जालना महानगरपालिकेच्या विविध विभागांमध्ये नियमित पदभरती होण्याची प्रतीक्षा अनेक इच्छुकांकडून केली जात आहे. ९९३ पदांचा आकृतिबंध मंजूर झाल्यापासूनच या भरतीकडे बेरोजगार तरुणांचे लक्ष लागले होते. आता सेवा प्रवेश नियमावलीला शासनाची मंजुरी मिळाल्यामुळे या भरती प्रक्रियेला प्रत्यक्ष सुरुवात होण्याच्या आशा अधिक बळावल्या आहेत.

शासनाचा हा निर्णय केवळ महापालिकेच्या प्रशासकीय यंत्रणेसाठीच नव्हे, तर स्थानिक रोजगाराच्या दृष्टीनेही महत्त्वाचा मानला जात आहे. मात्र, मंजूर ९९३ पदांपैकी प्रत्यक्षात किती पदे, कोणत्या टप्प्यात आणि कोणत्या भरती प्रक्रियेद्वारे भरली जाणार, याबाबत महापालिका प्रशासनाकडून पुढील अधिकृत कार्यवाही जाहीर होणे अपेक्षित आहे.

दरम्यान, सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण नियमावलीला मिळालेली मंजुरी ही जालना महापालिकेच्या संस्थात्मक वाटचालीतील महत्त्वाची पायरी मानली जात असून, आता प्रत्यक्ष पदभरतीकडे जालनेकरांचे लक्ष लागले आहे.

## आमदार अर्जुनराव...

झाल्याचा दावा करणे ही विसंगत भूमिका असल्याचेही भाजप नेत्याने म्हटले आहे. भाजप नेत्याच्या प्रतिक्रियेनुसार, महापालिका निर्मितीच्या प्रक्रियेवर टीका करणे आणि नागरिकांमध्ये कर वाढीबाबत भीती निर्माण करणे ही एक भूमिका होती; तर आता महापालिकेतील भरतीला शासनाची मान्यता मिळाल्यानंतर त्याचे श्रेय घेणे ही दुसरी भूमिका आहे. 'खोतकरांनी अशी दुटप्पी भूमिका घेऊ नये,' असा थेट टोला भाजप नेत्याने लगावला. या आरोपामुळे जालना महापालिकेच्या स्थापनेपासूनचा राजकीय वाद पुन्हा चर्चेत आला आहे.

## जीएसटी अनुदान...

तसेच विविध योजनांमध्ये महापालिकेला भरावा लागणारा स्वनिधीचा हिस्सा उभारण्यासाठी मोठा दिलासा मिळू शकतो, असे निवेदनात म्हटले आहे.

जालना शहरातील कला आणि नाट्यप्रेमींसाठी महत्त्वाच्या असलेल्या मा. कृष्णराव फुलंब्रीकर नाट्यगृहाच्या पुनर्बांधणीची मागणीही करण्यात आली आहे. शहरातील एकमेव नाट्यगृह मागील अनेक वर्षांपासून बंद असल्यामुळे कलाकार, नाट्यप्रेमी आणि सांस्कृतिक संस्थांना अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

जालना शहरातील मोती तलाव परिसरात, छत्रपती संभाजी उद्यानालगत तथागत महामानव गौतम बुद्ध यांचा पूर्णाकृती पुतळा उभारण्याची मागणी अनेक वर्षांपासून केली जात असल्याचे निवेदनात म्हटले आहे. पुतळा उभारणीबरोबरच छत्रपती संभाजी उद्यानाचे सर्वांगीण सुशोभीकरण करण्याचा प्रस्ताव मांडण्यात आला आहे. या दोन्ही कामांसाठी संयुक्तपणे ₹२५ कोटींचा निधी उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

जालना शहराचा विस्तार नवीन जालना भागात मोठ्या प्रमाणात होत असताना त्या भागातील नागरिकांसाठी पुरेशा सार्वजनिक मोकळ्या जागा व उद्यानांची गरज निर्माण झाली आहे.

निवेदनानुसार, सध्या जुन्या जालना भागात एक प्रमुख उद्यान उपलब्ध असून नवीन जालन्यातील नागरिकांसाठी परिसरातील उद्यानासाठी आरक्षित जागा महानगरपालिकेच्या ताब्यात देण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. या जागेवर भव्य व आधुनिक उद्यान विकसित करण्यासाठी ₹५० कोटींचा निधी मंजूर करण्याची मागणी करण्यात आली आहे.

शहरातील सार्वजनिक वाहतूक व्यवस्था मजबूत करण्यासाठी 'नगर परिवहन सेवा' सक्षमीकरणाचा मुद्दाही निवेदनात मांडण्यात आला आहे. जालना शहरात सार्वजनिक परिवहन सेवा उभारण्याची प्रक्रिया सुरू असल्याने त्यासाठी मोठ्या भांडवली खर्चाची आवश्यकता असल्याचे निवेदनात नमूद आहे. केंद्र सरकारच्या 'पीएम ई-बस सेवा' किंवा राज्य शासनाच्या नागरी विकास योजनांमधून जालन्यासाठी इलेक्ट्रिक बसेस उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात आली आहे.

यासोबतच बस डेपो, चार्जिंग सुविधा, देखभाल व्यवस्था आणि आवश्यक पायाभूत सुविधांसाठी विशेष निधी मंजूर करावा, तसेच या उपक्रमासाठी तांत्रिक व प्रशासकीय सहकार्य उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी करण्यात आली आहे. ई-बस सेवा सुरू झाल्यास शहरातील विद्यार्थी, महिला, ज्येष्ठ नागरिक, कामगार आणि रोज प्रवास करणाऱ्या नागरिकांना सार्वजनिक वाहतुकीचा पर्याय उपलब्ध होण्याची शक्यता आहे. जालना शहरातून वाहणाऱ्या सिना आणि कुंडलिका नद्यांच्या संवर्धनाचा मुद्दाही निवेदनात उपस्थित करण्यात आला आहे. पावसाळ्यात या नद्यांमधून मोठ्या प्रमाणात पाणी वाहून जाते. हे पाणी शहराच्या परिसरात अडवून त्याचा भूजल पुनर्भरणासाठी वापर करता येऊ शकतो. यासाठी नदी संवर्धन प्रकल्पाच्या माध्यमातून निधी उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात आली आहे.

नदीपात्राचे संवर्धन, पाणी अडविण्याच्या उपाययोजना आणि भूजल पातळी वाढविण्यासाठी शास्त्रीय पद्धतीने प्रकल्प राबविल्यास शहराच्या भविष्यातील पाणीप्रश्नावरही त्याचा सकारात्मक परिणाम होऊ शकतो. जालन्यातील खेळाडू आणि क्रीडाप्रेमींसाठी महानगरपालिकेच्या विद्यमान स्टेडियमच्या जागेत स्व. कल्याणराव घोगरे इनडोअर क्रीडा स्टेडियम उभारण्याचा प्रस्ताव देण्यात आला आहे.

अत्याधुनिक सुविधा असलेल्या या इनडोअर स्टेडियमसाठी ₹५ कोटींचा निधी मंजूर करावा, अशी मागणी करण्यात आली आहे. शहरातील खेळाडूंना वर्षभर सराव व विविध इनडोअर क्रीडा स्पर्धांचे आयोजन करता यावे, हा या प्रस्तावामागील उद्देश आहे. या सर्व मागण्यांच्या पार्श्वभूमीवर जालना महापालिकेसमोर आर्थिक सक्षमतेचा प्रश्न महत्त्वाचा ठरणार आहे. महापालिकेच्या दैनंदिन प्रशासकीय खर्चाबरोबरच पाणीपुरवठा, स्वच्छता, रस्ते, पथदिवे, आरोग्य, उद्याने आणि अन्य नागरी सुविधांसाठी मोठ्या प्रमाणात निधी आवश्यक आहे. त्यामुळे अनुदानात वाढ आणि ₹२७७ कोटींच्या सहाय्यक अनुदानातील फरकाची रक्कम मिळाल्यास महापालिकेच्या आर्थिक क्षमतेत वाढ होऊ शकते. त्यातून प्रस्तावित विकासकामांसाठी आवश्यक असलेला महापालिकेचा स्वनिधीचा हिस्सा उभारणेही तुलनेने सुलभ होण्याची शक्यता आहे. महापौर व उपमहापौरांनी मुख्यमंत्री फडणवीस यांना दिलेल्या निवेदनात वरील सर्व मागण्यांचा सकारात्मक विचार करून संबंधित विभागांना तातडीने प्रशासकीय मंजुरी आणि आवश्यक निधी उपलब्ध करून देण्याचे निर्देश द्यावेत, अशी विनंती केली आहे.

एकूणच, महापालिकेचे प्रशासकीय सक्षमीकरण, आर्थिक उत्पन्न वाढविणे आणि शहरातील पायाभूत सुविधांना गती देणे, या तीन प्रमुख दिशांनी हे निवेदन महत्त्वाचे ठरत असून शासनाच्या सकारात्मक निर्णयांमुळे जालन्याच्या विकासाला मोठी चालना मिळू शकते.

## आधी शेतरस्ते...

कारखान्याच्या सहकार्याने पाथरवाला खुर्द येथील जिल्हा परिषद शाळा अधिक सक्षम करण्याचा निर्णय घेतला. जिल्हा परिषद शाळेच्या सक्षमीकरणासाठी पुढाकार घेतल्याबद्दल शाळेतील विद्यार्थी, पालक आणि शिक्षकांनी समाधान व्यक्त करत सतीश घाटगे यांचे आभार मानले.

यावेळी गावचे सरपंच, शालेय समितीचे पदाधिकारी, सर्व शिक्षक, मुख्याध्यापक आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**जिल्हा परिषद शाळा हायटेक बनवणार - सतीश घाटगे**

शाळेतील विद्यार्थ्यांना आधुनिक आणि दर्जेदार शैक्षणिक सुविधा मिळाव्यात, यासाठी हायटेक क्लासरूम, शुद्ध पिण्याच्या पाण्यासाठी आरओ फिल्टरची व्यवस्था, मुलींसाठी सॅनिटरी नॅपकिनची व्यवस्था, सुसज्ज स्वच्छतागृह तसेच नवीन शाळा इमारतीच्या बांधकामासाठी आवश्यक ती मदत करण्याचा शब्द सतीश घाटगे यांनी यावेळी दिला.

## टेंभुर्णी जाफ्राबाद...

अनेक अपघातांच्या घटना घडल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. त्यामुळे या मार्गावरील धोकादायक ठिकाणांची संबंधित विभागाने पाहणी करून आवश्यक त्या सुरक्षा उपाययोजना कराव्यात, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.रस्त्यावर वाहनांची वाढती वर्दळ लक्षात घेता वाहनचालकांनी वेगावर नियंत्रण ठेवून काळजीपूर्वक वाहन चालविण्याचे आवाहन करण्यात येत आहे. तसेच वारंवार होणारे अपघात टाळण्यासाठी रस्त्याची स्थिती,वळणे,झुडपे आणि इतर धोकादायक ठिकाणी आवश्यक सुरक्षा उपाययोजना करण्याची गरज आहे.अपघात वाढत असून जीवन सस्ते झाले की काय असे वाटत असून इतके अपघात असून काहीच उपाय योजना होत नाही करत नाही या बद्दल चर्चा होत आहे.

## सावरगाव...

आले. शेतकरी चळवळीत युवकांचा सहभाग वाढविण्यावरही भर देण्यात आला.

कार्यक्रमास स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे तालुका अध्यक्ष सुदाम शेवत्रे, पक्षाचे तालुका अध्यक्ष समाधान गाढवे, आकाश मुरकुटे, गणेश मुरकुटे, भीमराव राऊत, रामदास शेवत्रे, उत्तम जाधव, सम ाधान गायकवाड, रामदास नेवरे यांच्यासह सावरगाव म्हस्के येथील शेतकरी, युवक, कार्यकर्ते व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## वेदोक्त मंत्रोच्चारात...

मातीच्या शिवलिंगाचे पूजन करण्याचे विशेष महत्त्व आहे. माती ही निसर्गाचे मूळ रूप असून, स्वतःच्या हाताने पार्थिव शिवलिंग घडवून त्याचे भक्तिभावाने पूजन केल्यास मानसिक शांती, सकारात्मक ऊर्जा आणि सर्व मनोकामनांची पूर्ती होते.

विधिवत पूजनानंतर महाआरती करण्यात आली व उपस्थितांना महाप्रसाद वाटप करून सोहळ्याची सांगता झाली. याप्रसंगी मंडळाच्या वरिष्ठ सदस्य निर्मला करवा, चंद्रकला भक्कड, सावित्रीबाई मल्लावत, सुषमाताई पायगव्हाणे यांच्यासह शहरातील बहुसंख्य भाविक महिला उपस्थित होत्या. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी आदर्श भगिनी मंडळाच्या अध्यक्षा निर्मला साबू, सचिव संगीता मुंदडा, प्रकल्प प्रमुख प्रमिला मंत्री, मंगल भंडारी, कांता सोनी, लक्ष्मी मोहता, अनिता राठी आणि शारदा मुंदडा यांनी विशेष परिश्रम घेतले.

## जलसंधारण...

वॉकॅथॉन'मध्ये नागरिकांनी उत्स्फूर्तपणे सहभागी होऊन जलसंधारणाचा संदेश घराघरांत पोहोचवावा, असे आवाहन करण्यात आले आहे. २१ ऑगस्ट रोजी सकाळी ७ वाजता जिल्हाधिकारी कार्यालयात उपस्थित राहून या 'महा-वॉकॅथॉन' उपक्रमात सहभागी होण्याचे आवाहन मृद व जलसंधारण विभागाने केले आहे.

# स्टेशनवर निरोप देताना डोळे पाणावायचे; आज स्मशानातही डोळे कोरडे... काळ बदलला की माणसं?

## मोबाईल, धावपळ, स्पर्धा आणि औपचारिक नात्यांच्या गर्दीत हरवत चालली संवेदनशीलता; जन्मापासून मृत्यूपर्यंत 'सोयी' वाढल्या, पण माणुसकी कमी झाली का?

**दत्ता देशमुख**

एक काळ असा होता, की रेल्वे स्टेशनवर किंवा बसस्थानकावर आपल्या जवळच्या व्यक्तीला निरोप देण्यासाठी गेल्यावर गाडी सुटेपर्यंत हात हलत राहायचे. ट्रेन किंवा बस नजरेआड होईपर्यंत डोळे त्याच दिशेने लागलेले असायचे. गाडी निघून गेल्यानंतरही काही क्षण तिथेच उभे राहण्याची भावना असायची. निरोपाच्या त्या क्षणी डोळ्यांच्या कडा नकळत ओलावायच्या. कारण त्या नात्यांमध्ये जिव्हाळा होता, काळजी होती आणि 'आपलं माणूस दूर जात आहे' ही भावना मनाला स्पर्शून जायची.

आजही स्टेशन आणि बसस्थानकं आहेत. माणसंही आहेत. प्रवासही सुरूच आहेत. मात्र निरोप देण्याची पद्धत बदलली आहे. पूर्वी गाडी सुटेपर्यंत व्यक्तीसमोर उभे राहणारे हात आता मोबाईलच्या स्क्रीनवर व्यस्त दिसतात. निरोप देतानाही फोटो, व्हिडिओ, फोन कॉल किंवा पुढील कामांची घाई अधिक जाणवते. काळ बदलला आहे, पण प्रश्न एवढाच आहे की काळाबरोबर माणसांची भावनाही बदलली आहे का?

**गर्दीत माणूस हरवतोय; पण कुणाला वेळ आहे?**

आजच्या वेगवान जीवनात प्रत्येक व्यक्ती स्वतःच्या धावपळीत अडकलेली दिसते. नोकरी, व्यवसाय, कर्ज, , मुलांचे शिक्षण, घरखर्च, सामाजिक प्रतिष्ठा, स्पर्धा आणि भविष्याची चिंता या सगळ्यांच्या ओझ्याखाली माणूस जगत आहे.

पूर्वी शेजारच्या घरात कोण आजारी आहे, कोणाच्या घरात अडचण आहे, कोणाला मदतीची गरज आहे, याची चौकशी सहज व्हायची. आज अनेकदा एकाच इमारतीत वर्षानुवर्षे राहूनही शेजाऱ्याचे नाव माहीत नसते.

गर्दीत एखादा परिचित माणूस दिसला तरी थांबून दोन शब्द बोलण्याऐवजी 'नंतर बोलू' असे म्हणत पुढे जाणे सहज झाले आहे. वेळ नाही, असे आपण वारंवार सांगतो. मात्र सोशल मीडियावर तासन्□तास स्क्रोल करण्यासाठी वेळ कसा मिळतो, हा प्रश्नही तितकाच महत्त्वाचा आहे.

**स्मशानातही मोबाईलची स्क्रीन अधिक महत्त्वाची?**

मृत्यू हा प्रत्येकाच्या आयुष्यातील सर्वांत अंतिम आणि गंभीर प्रसंग. एखाद्या व्यक्तीच्या निधनानंतर तिच्या आठवणी, तिच्यासोबतचे संबंध आणि आयुष्यभराचा सहवास डोळ्यांसमोर उभा राहतो.

पूर्वी अंत्यविधीला उपस्थित राहणाऱ्या प्रत्येक व्यक्तीच्या चेहऱ्यावर दुःखाची छाया दिसायची. नातेवाईकांना धीर देण्यासाठी लोक तासन्□तास सोबत थांबायचे. आजही अनेक ठिकाणी ही संवेदना जिवंत आहे; मात्र काही ठिकाणी अंत्यसंस्कारासारख्या गंभीर प्रसंगीही मोबाईलवर बोलणे, संदेश तपासणे किंवा सोशल मीडियात व्यस्त राहणे ही बाब खटकू लागली आहे.

अर्थात, प्रत्येक व्यक्तीच्या दुःखाची अभिव्यक्ती वेगळी असते. प्रत्येकाच्या डोळ्यात अश्रू असतीलच असे नाही. मात्र प्रश्न अश्रूंचा नसून संवेदनशीलतेचा आहे. एखाद्याच्या दुःखाच्या क्षणी आपण त्याच्यासोबत मनापासून उभे राहतो का? एवढाच खरा प्रश्न आहे.

**जन्म महागला, मृत्यूही तंत्रज्ञानाच्या आधारावर**

आज विज्ञान आणि वैद्यकीय तंत्रज्ञानाने मानवी आयुष्य मोठ्या प्रमाणात सुरक्षित आणि सुलभ केले आहे. गुंतागुंतीच्या प्रसूती, गंभीर आजार, अपघात आणि जीवन-मरणाच्या प्रसंगात आधुनिक वैद्यकीय सुविधा लाखो जीव वाचवत आहेत. त्यामुळे तंत्रज्ञानाला दोष देणे योग्य ठरणार नाही.

मात्र या बदलाकडे एका वेगळ्या सामाजिक दृष्टिकोनातून पाहण्याची गरज आहे.

'सिझेरियनशिवाय जन्म नाही, व्हेंटिलेटरशिवाय शेवट नाही' ही भावना आजच्या बदलत्या जीवनशैलीचे रूपक म्हणून पाहता येते. आयुष्याच्या सुरुवातीपासून शेवटपर्यंत माणूस अधिकाधिक तंत्रज्ञान, सुविधा आणि आर्थिक व्यवस्थेवर अवलंबून होत चालला आहे. याच काळात जीवनाच्या मध्यावर मात्र कर्ज, , स्पर्धा, अपेक्षा, प्रतिष्ठा आणि दिखाव्याची धावपळ सुरू आहे.

**नात्यांमध्ये प्रेमापेक्षा 'फायदा'?**

नात्यांचा पाया प्रेम, विश्वास आणि परस्पर आधारावर असतो. मात्र बदलत्या सामाजिक वातावरणात काही नात्यांमध्ये स्वार्थाचे गणित वाढताना दिसते.

'याच्याकडून आपल्याला काय मिळेल?' या विचारातून माणूस जवळ केला जातो आणि उपयोग संपल्यानंतर त्याच व्यक्तीपासून अंतर ठेवले जाते, अशी भावना अनेकांच्या मनात निर्माण झाली आहे.

आजच्या डिजिटल जगात हजारो 'फ्रेंड्स' आणि 'फॉलोअर्स' असू शकतात; पण संकटाच्या वेळी फोन करून विचारणारे किती जण आहेत, हा प्रश्न प्रत्येकाने स्वतःला विचारण्याची गरज आहे.

सोशल मीडियावरील शुभेच्छांचा वर्षाव मोठा असतो; मात्र प्रत्यक्ष आयुष्यात एखाद्याच्या अडचणीच्या वेळी खांद्याला खांदा लावून उभे राहणाऱ्यांची संख्या कमी होत असल्याची खंत अनेकदा व्यक्त केली जाते.

**वस्तू जपतो, माणसं हरवतो**

घरात महागड्या वस्तूंची काळजी घेतली जाते. वाहनावर ओरखडा पडला तर मनाला लागते. मोबाईलची स्क्रीन फुटली तर लगेच दुरुस्ती केली जाते. घरातील वस्तूंची देखभाल केली जाते.

पण कधी कधी आपल्या एखाद्या शब्दाने जवळच्या माणसाच्या मनाला झालेली जखम मात्र दुर्लक्षित राहते. ही विसंगती विचार करण्यास भाग पाडते.

आपण वस्तूंचे आयुष्य वाढविण्यासाठी प्रयत्न करतो; पण नात्यांचे आयुष्य वाढविण्यासाठी किती वेळ देतो?

**खरे हसू आणि खरे अश्रू दुर्मिळ का झाले?**

आज माणूस हसतो, पण अनेकदा ते हसू सोशल मीडियासाठी असते. दुःख असते, पण ते व्यक्त करण्यासाठीही संकोच वाटतो. भावना व्यक्त करण्यापेक्षा त्या लपविण्याची सवय वाढली आहे.

'मी ठीक आहे' हे वाक्य अनेकदा मनातील अस्वस्थता लपवते.

माणूस बाहेरून यशस्वी दिसतो; मात्र आतून एकटेपणाशी झुंजत असतो. त्याच्याकडे पैसा असतो, सुविधा असतात, संपर्कांची मोठी यादी असते; पण मन मोकळे करून बोलता येईल असे दोन-चार जिवलग लोक नसतील तर त्या संपत्तीचे मोल किती?

**तरीही माणुसकी संपलेली नाही**

या सगळ्या चित्राचा अर्थ समाज पूर्णपणे संवेदनाहीन झाला आहे, असा नाही.

आजही अपघातग्रस्ताला मदत करण्यासाठी धावणारे अनोळखी लोक आहेत. संकटाच्या वेळी रक्तदान करणारे तरुण आहेत. गरजू विद्यार्थ्यांना मदत करणारे हात आहेत. आजारी व्यक्तीसाठी रात्रभर रुग्णालयात थांबणारे मित्र आहेत. अंत्यविधीला कुटुंबाच्या दुःखात सहभागी होणारे शेजारी आहेत. म्हणूनच आशा अजूनही जिवंत आहे.

गरज आहे ती या माणुसकीला जपण्याची आणि पुढच्या पिढीकडे पोहोचवण्याची.

**बदलाची सुरुवात स्वतःपासून**

समाज बदलण्याची जबाबदारी केवळ सरकार, प्रशासन किंवा व्यवस्थेची नाही. प्रत्येक व्यक्तीने स्वतःच्या वागण्यात छोटासा बदल केला तरी त्याचा परिणाम मोठा होऊ शकतो.

एखाद्या वृद्ध व्यक्तीशी दोन मिनिटे प्रेमाने बोलणे, आजारी मित्राची विचारपूस करणे, संकटात असलेल्या व्यक्तीच्या पाठीशी उभे राहणे, कुटुंबासोबत मोबाईल बाजूला ठेवून वेळ घालवणे, मुलांना संवेदनशीलतेचे संस्कार देणे आणि आपल्या माणसांना त्यांच्या किमतीची जाणीव करून देणेहीच खरी सामाजिक गुंतवणूक आहे.

शेवटी पैसा, घर, गाडी, पद, प्रतिष्ठा किंवा संपत्ती यापैकी काहीही आपल्या सोबत कायमचे येत नाही.

मागे राहतात ती माणसं, त्यांच्या आठवणी आणि आपण त्यांच्या आयुष्यात निर्माण केलेले क्षण.

म्हणूनच प्रश्न 'काळ बदलला की माणसं बदलली?' एवढाच नाही. खरा प्रश्न असा आहे. काळ कितीही बदलला तरी आपण आपल्या आतला माणूस जिवंत ठेवणार आहोत का?

कारण शेवटी आयुष्य किती मोठे जगलो यापेक्षा, किती माणुसकीने जगलो, हेच अधिक महत्त्वाचे ठरते.

**नाती जपा... माणसं जपा...**

कारण संपत्तीची किंमत काळानुसार बदलते; पण माणुसकीने जगलेला एक क्षण आयुष्यभराची आठवण बनून राहतो.

---

# लाड सुवर्णकार पुस्तिकेचे उपमुख्यमंत्री शिंदे यांच्या हस्ते प्रकाशन



**जालना - प्रतिनिधी**

: जालना लाड सुवर्णकार समाज प्रतिष्ठानच्या वतीने जालना जिल्ह्यातील समाज बांधवांची जनगणना करण्यात आली असून या संदर्भात तयार केलेल्या पुस्तिकेचे विमोचन आ.अर्जुनराव खोतकर यांच्या पुढाकाराने उपमुख्यमंत्री ना. एकनाथराव शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले. मंगळवारी (ता.१८) मुंबई येथे झालेल्या प्रकाशन सोहळ्यास आ. अर्जुनराव खोतकर, लाड सुवर्णकार समाज प्रतिष्ठानचे अध्यक्ष सूर्यप्रकाश उदावंत, सचिव मुकुंद दहिवाळ, उपाध्यक्ष अंशुमन नेवासेकर , अनिल दहिवाळ, बद्रीनारायण उदावंत ,व्यंकटेश सुवर्णकार, अरविंद टाकळकर, सुरेंद्र शेडुते, बालाजी सुवर्णकार ,भगवान शेडुते ,गोपाल आर्य ,सुधीर डहाळे यांच्यासह समाज बांधवांची उपस्थिती होती.

# पिंपळवंडी बालिका अत्याचार व हत्या प्रकरण: खटला फास्ट ट्रॅक कोर्टात चालविण्यासाठी मुख्यमंत्र्यांकडे विनंती करणार - उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार

**मुंबई - प्रतिनिधी**

पिंपळवंडी (ता. जुन्नर, जि. पुणे) येथे साडेनऊ वर्षाच्या चिमुकलीवर अत्याचार करून तिची निर्घृण हत्या करण्यात आल्याची घटना अत्यंत दुर्दैवी व धक्कादायक आहे. यासंदर्भात आपण पुणे जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक संदीप सिंह गिल यांच्याशी दूरध्वनीवरून संवाद साधून तपासाचा आढावा घेतला. या प्रकरणाची अत्यंत पारदर्शक व सखोल चौकशी करून नराधम आरोपीवर कठोर कारवाई करण्याचे स्पष्ट निर्देश पोलीस



प्रशासनाला देण्यात आल्याची माहिती उपमुख्यमंत्री तथा पुणे जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी दिली.

**फास्ट ट्रॅक कोर्टासाठी मुख्यमंत्र्यांकडे विनंती करणार**

या घटनेबाबत तीव्र दुःख व्यक्त करताना उपमुख्यमंत्री श्रीमती पवार म्हणाल्या, ''हे कृत्य अत्यंत निंदनीय आणि माणुसकीला काळीमा फासणारे आहे. पोलिसांनी तत्परतेने कारवाई करत संशयित तरुणाला ताब्यात घेतले असून पुढील तपास वेगाने सुरू आहे. या प्रकरणातील आरोपीला लवकरात लवकर कठोर शिक्षा व्हावी, यासाठी हा खटला जलदगती न्यायालयात चालवला जावा, अशी विशेष विनंती मी मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे करणार आहे.''

**पीडित कुटुंबाची लवकरच घेणार भेट**

पीडित कुटुंबाच्या पाठीशी शासन खंबीरपणे उभे असल्याचे स्पष्ट करत उपमुख्यमंत्र्यांनी सांगितले की, त्या लवकरच स्वतः पिंपळवंडी येथे भेट देऊन पीडित कुटुंबाची भेट घेणार आहेत.

# स्वातंत्र्यदिनी गोंधनखेड्यात शिक्षणक्रांतीची मुहूर्तमेढ

**(दत्ता देशमुख)**

स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून जाफ्राबाद तालुक्यातील गोंधनखेडा येथे जिल्हा परिषद प्राथमिक शाळेला डिजिटल शाळेचे स्वरूप देण्याचा संकल्प ग्रामस्थांनी केला. या उपक्रम ाला पहिल्याच दिवशी उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत ग्रामस्थांनी तब्बल २ लाख ८९ हजार रुपयांचा निधी जमा केला. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनाही आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून दर्जेदार व गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळावे, डिजिटल साधनांचा वापर करून विद्यार्थ्यांना आनंददायी शिक्षण घेता यावे, या उद्देशाने हा उपक्रम हाती घेण्यात आला आहे. शाळेच्या विकासासाठी शाळा ही केवळ विद्यार्थ्यांची नसून संपूर्ण गावाची जबाबदारी आहे, या भावनेतून ग्राम स्थांनी आर्थिक मदतीचा हात पुढे केला. जमा झालेल्या निधीतून शाळेत डिजिटल शिक्षणासाठी



आवश्यक सुविधा

**डिजिटल शाळेसाठी पहिल्याच दिवशी २.८९ लाखांचा निधी जमा**

उभारण्यात येणार असून, विद्यार्थ्यांना तंत्रज्ञानाच्या युगाशी जोडण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. पहिल्याच दिवशी मोठ्या प्रमाणात निधी जमा झाल्याने शिक्षक, पालक व विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक बी. व्ही. माटे यांनी केले. त्यांनी शाळेची शैक्षणिक वाटचाल, डिजिटल शिक्षणाची गरज आणि शाळेच्या विकासासाठी ग्रामस्थांच्या सहकार्याचे महत्त्व स्पष्ट केले. सूत्रसंचालन व्ही. व्ही. देशमुख यांनी केले, तर आभार एस. डी. थोरात यांनी मानले. यावेळी ग्रामस्थ, पालक, शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते. ग्रामस्थांच्या स्वेच्छेच्या योगदानातून उभी राहणारी ही डिजिटल शाळा विद्यार्थ्यांच्या भविष्यासाठी महत्त्वाचा टप्पा ठरणार असून, गोंधनखेडा ग्रामस्थांच्या एकजुटीतून ग्रामीण शिक्षणाच्या विकासाचा आदर्श निर्माण झाला आहे.

# जिजाऊ स्कूलमध्ये स्वातंत्र्यदिन साजरा

## विद्यार्थ्यांच्या देशभक्तीपर सादरीकरणाने रंगला स्वातंत्र्यदिन सोहळा

**दत्ता देशमुख**

जाफराबाद येथील जिजाऊ इंटरनॅशनल इंग्लिश स्कूलमध्ये १५ ऑगस्ट रोजी ८० वा स्वातंत्र्यदिन मोठ्या उत्साहात, जल्लोषात आणि देशभक्तीमय वातावरणात साजरा करण्यात आला. स्वातंत्र्यदिनानिमित्त शाळेच्या वतीने ध्वजारोहण, प्रभात फेरी, - लेझीम पथक, देशभक्तीपर गीते, नाटिका - तसेच विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे - आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाची सुरुवात उत्साहपूर्ण - वातावरणात झाली. संतोष जोडीवाले यांच्या हस्ते राष्ट्रध्वजाचे ध्वजारोहण - करण्यात आले. देशाच्या स्वातंत्र्यासाठी - बलिदान देणाऱ्या स्वातंत्र्यसैनिकांचे योगदान, भारतीय संविधानाचे महत्त्व आणि राष्ट्रनिर्माणामध्ये विद्यार्थ्यांची भूमिका - याबाबत मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी मन लावून शिक्षण घेऊन जबाबदार नागरिक - बनावे आणि देशाच्या प्रगतीमध्ये आपले योगदान द्यावे, असे



आवाहन केले. विद्यार्थ्यांनी साकारलेल्या व्यक्तिरेखांनी उपस्थितांचे वेधले लक्ष

कार्यक्रमातील विशेष आकर्षण म्हणजे विद्यार्थ्यांनी सादर केलेली देशभक्तीपर गीते, नाटिका आणि विविध महापुरुषांच्या व स्वातंत्र्यसैनिकांच्या वेशभूषा. विद्यार्थ्यांनी साकारलेल्या विविध व्यक्तिरेखांनी उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. या कार्यक्रमाला विठ्ठल सुरवसे, सुदर्शन लोखंडे, सागर जारवाल, भास्कर लोखंडे, सतीश देवरे, गालिब शेख, संतोष जोडीवाले, मोहम्मद रईस शेख, परमेश्वर डुकरे, शंकर लोखंडे, गजानन दिवटे, मयूर भोपळे, नंदकिशोर धबडकर, विद्या लोखंडे, पूजा भुतेकर, दिपाली लोखंडे, अंजना पंडित यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच शाळेचे मुख्याध्यापक योगेश शिंपी यांच्यासह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# तरुण पिढीला नशेच्या दुष्टचक्रात जाण्यापासून रोखण्यासाठी सामूहिक प्रयत्न करणे आवश्यक - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**मुंबई - प्रतिनिधी**

तरुण पिढी नशेच्या आहारी गेल्यानंतर उपाययोजना करण्यापेक्षा तरुणांना नशेच्या गर्तेत ढकलणाऱ्या प्रवृत्तींना प्रतिबंधित करावे. तरुणांच्या समस्या लक्षात घेऊन त्यांना सहानुभूतीने या दुष्टचक्रात जाण्यापासून रोखावे, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी वर्षा निवासस्थानी नशा मुक्त महाराष्ट्र धोरण सादरीकरणाबाबत आयोजित बैठकीत दिले. नशामुक्त महाराष्ट्रासाठी शासकीय यंत्रणाचा दृष्टिकोन महत्वाचा ठरणार आहे. सर्व संबंधित विभागांनी आपली जबाबदारी ओळखून प्रभावी भूमिका बजाविल्यास पुढील काळात निश्चितच नशामुक्त महाराष्ट्र घडविता येईल, अशी अपेक्षाही मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केली. बैठकीला गृह (ग्रामीण) राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर, गृह (शहरे) राज्यमंत्री योगेश कदम उपस्थित होते.

नशेच्या दुष्टचक्रात अडकलेल्या तरुणांना यामधून बाहेर पडण्यासाठी प्रत्येक शासकीय रुग्णालयांमध्ये नशा मुक्ती केंद्र स्थापन करण्याच्या सूचना देत मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, वैद्यकीय शिक्षण विभागाच्या सर्व शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये नशामुक्ती केंद्र कार्यान्वित करावीत. राज्यामध्ये केंद्र शासनाच्या माध्यमातून कार्यरत असलेल्या नशामुक्ती केंद्रांचे सक्षमीकरण करण्यात यावे. यासाठी आवश्यकता असल्यास निधीची तरतूद करण्यात यावी. या केंद्रांच्या माध्यमातून नशामुक्तीचे प्रभावी कार्यान्वयन होण्यासाठी विशिष्ट कार्यप्रणाली विकसित करावी. नशामुक्त झालेली तरुणाई पुन्हा नशेच्या गर्तेत जाऊ नये, यासाठी नशा मुक्ती केंद्रांच्या साखळीसोबतच त्यास कारणीभूत ठरत असलेल्या घटकांवर नियंत्रण आणावे.

**शाळा आणि महाविद्यालयाचा परिसर**



**टपरीमुक्त असावा**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, प्रत्येक शाळा आणि महाविद्यालयाचा परिसर हा टपरीमुक्त असावा. याबाबत कुठलीही तडजोड करता कामा नये. सर्व शैक्षणिक संस्थांचा परिसर हा अमली पदार्थ मुक्त असावा. संबंधित शैक्षणिक संस्थांच्या प्राचार्य, मुख्याध्यापक यांनी शैक्षणिक आस्थापनेचा कॅम्पस अमली पदार्थ मुक्त घोषित करण्याची कार्यवाही करावी. शालेय शिक्षणात अमली पदार्थांचे दुष्परिणाम यावर आधारित अभ्यासक्रम समावेशाची कार्यवाही पूर्ण करावी. अमली पदार्थ विषयक गुन्ह्यांमध्ये एनडीपीएस (नार्कोटिक ड्रग्ज अँड सायकोट्रॉपिक सबस्टन्सेस ॲक्ट) सारख्या कायद्यांचा प्रभावी उपयोग करीत गतीने निकालाची कार्यवाही पूर्ण होण्यासाठी जलदगती न्यायालये स्थापन करावी. यासोबतच अशा गुन्हांच्या निपटाऱ्यांसाठी केंद्र शासनाच्या धर्तीवर विशेष सरकारी अभियोत्यांच्या पॅनलची व्यवस्था करावी. हे पॅनल राज्य शासनाच्या अधिकारांतर्गत नियुक्त करण्याची तरतूद असावी. नशामुक्त महाराष्ट्राचे स्वप्न साकारण्यासाठी संपूर्ण शासकीय यंत्रणेचा सर्वसमावेशक दृष्टिकोन असणे गरजेचे आहे. यासाठी सकारात्मक दृष्टिकोन ठेवत अमली पदार्थांशी निगडित संपूर्ण परिसंस्थेवर नियंत्रण आणावे. समाजामध्ये अंमली पदार्थ विषयी जनजागृती करण्यासाठी जगातील यशस्वी पद्धतींचा अभ्यास करीत प्रभावी संदेश प्रणाली विकसित करावी. नशेच्या दुष्टचक्रात चुकीने आलेल्या तरुणांना कुठेही गुन्हेगार असल्याचे मानसिकता तयार होऊ देऊ नये. त्यांना नशामुक्ती केंद्राच्या माध्यमातून त्यांना सकारात्मक आयुष्याचा अनुभव द्यावा. नैसर्गिक अमली पदार्थ उत्पादन करीत असल्याचे निदर्शनास आल्यास त्यांच्यावर कठोर कारवाई करण्यात यावी, असा इशाराही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिला. तरुणांमध्ये नशा करण्याची लक्षणे आढळल्यास त्यावर तातडीने उपाययोजना करण्यात याव्यात. अमली पदार्थविरोधी कारवाईमध्ये जिल्हास्तरीय समित्यांची भूमिका अत्यंत महत्वाची आहे. या समित्यांच्या कार्याचे मूल्यमापन करण्यात यावे. त्यांच्या कामगिरीच्या आधारावर जिल्ह्याची रँकिंग पद्धत विकसित करावी. तसेच मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय 'एन कॉर्ड ' शिखर समितीची स्थापना करण्यात यावी, असेही निर्देश मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिले. बैठकीत अपर मुख्य सचिव (गृह) मनीषा म्हैसकर यांनी सादरीकरण केले. बैठकीस मुख्य सचिव राजेश अग्रवाल, अपर मुख्य सचिव (वने) मिलिंद म्हैसकर, अपर मुख्य सचिव (महसूल) विकास खारगे, अपर मुख्य सचिव (परिवहन) संजय सेठी, प्रधान सचिव अनुपकुमार सिंग, पोलिस महासंचालक सदानंद दाते, मुंबई पोलिस आयुक्त देवेन भारती, माहिती व जनसंपर्कचे प्रधान सचिव तथा महासंचालक ब्रिजेश सिंह, अमली पदार्थ विरोधी कृती दलाचे विशेष पोलीस महानिरीक्षक ज्योती प्रिया सिंग, अन्न व औषध प्रशासन आयुक्त तुकाराम मुंढे आदी उपस्थित होते.

# संबोधी संदीप इंगोले गीत गायन स्पर्धेत प्रथम

**दत्ता देशमुख**

स्वातंत्र्यदिनाच्या निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या गीत त गायन स्पर्धेतऑक्सफर्ड इंग्लिश स्कूल, जालना येथील इयत्ता सातवीत शिकणाऱ्या संबोधी संदीप इंगोले हिने आपल्या सुमधुर व दमदार गायनाने प्रथम क्रमांक पटकावला. तिच्या या उल्लेखनीय यशाबद्दल सर्व स्तरातून तिचे कौतुक होत आहे. स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून दैनिक नायक, आरंभ आणि राष्ट्रमाता अकॅडमी यांच्या संयुक्त विद्यमाने या गीत गायन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. स्पर्धेत विविध विद्यार्थ्यांनी




उत्स्फूर्त सहभाग नोंदवून देशभक्तिपर गीतांचे सादरीकरण केले.

संबोधी इंगोले हिने देशभक्तीची भावना जागविणारे गीत अत्यंत आत्मविश्वासाने, सुरेल आवाजात आणि प्रभावी भावमुद्रांसह सादर केले. तिच्या सादरीकरणाला उपस्थितांकडून उत्स्फूर्त दाद मिळाली. आपल्या उत्कृष्ट गायनाच्या जोरावर तिने स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळविला. संबोधीच्या या यशाबद्दल ऑक्सफर्ड इंग्लिश स्कूलमधील मुख्याध्यापक, शिक्षकवृंद आणि सहकाऱ्यांनी तिचे विशेष कौतुक करून अभिनंदन केले.

तिच्या अंगी असलेल्या गायनकलेचे आणि आत्मविश्वासाचे शिक्षकांनी कौतुक करत, भविष्यातही विविध क्षेत्रांत उत्तुंग यश संपादन करण्यासाठी तिला शुभेच्छा दिल्या.

संबोधीच्या या यशामुळे तिचे पालक, शिक्षक, नातेवाईक तसेच मित्रपरिवारात आनंदाचे वातावरण असून तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. मेहनत, आत्मविश्वास आणि कलागुणांना योग्य व्यासपीठ मिळाल्यास विद्यार्थी नक्कीच यशाची शिखरे गाठू शकतात, याचे सुंदर उदाहरण संबोधीच्या यशातून पाहायला मिळाले.

तिच्या या उल्लेखनीय कामगिरीबद्दल आयोजक, परीक्षक, शिक्षक व उपस्थित मान्यवरांनी संबोधीचे अभिनंदन करून तिच्या उज्ज्वल भविष्यासाठी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या.

## मेरखेडा जिल्हा परिषद शाळेत व्यवस्थापन समिती गठीत
## अध्यक्षपदी प्रमोद जाधव, उपाध्यक्षपदी गणेश जाधव यांची निवड

**दत्ता देशमुख**

जाफ्राबाद तालुक्यातील मेरखेडा येथील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेत शाळा व्यवस्थापन समितीची नवीन कार्यकारिणी गठीत करण्यात आली. समितीच्या अध्यक्षपदी प्रमोद संजय जाधव, तर उपाध्यक्षपदी गणेश देविदास जाधव यांची सर्वानुमते निवड करण्यात आली.

**शाळेच्या विकासासह विद्यार्थ्यांची शैक्षणिक**

प्रगतीण्या आणि शाळविविधस्था उपक्रामती प्रभावीपणे महत्त्वाची असते. त्यानुसार शाळेत समितीची निवड प्रक्रिया पार पडली.

यावेळी गावचे सरपंच



सुखदेवराव जाधव, उपसरपंच गणेश आबा जाधव, अंकुशराव जाधव, दिपकराव जाधव यांची उपस्थिती होती.

श ा ळ े च े मुख्याध्यापक भगवान भालके यांनी समिती गठीत करण्याची प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी विशेष परिश्रम घेतले. नवीन समितीच्या माध्यमातून शाळेच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्न करून विद्यार्थ्यांना अधिक चांगल्या शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

## टेंभुर्णी जाफ्राबाद रोडवर अपघात श्रृंखला सुरूच
## दिवसभरात दोन अपघात एक गंभीर जालना दाखल

**दत्ता देशमुख**

टेंभुर्णी जाफ्राबाद रोडवर अपघाताची श्रृंखला वाढतच चालली असून दिनांक १८ ऑगस्ट रोजी दुपारी १ ते १.३० वाजेच्या सुमारास पुन्हा एक अपघाताची घटना घडली. दुसरी घटना सहा वाजेच्या सुमारास या रोड वरील गौरी आश्रम मठाजवळ घडली असून सय्यद युसूफ पठाण वय ५५ राहणार नळविहारा येथील असून त्यांची प्रकृती चिंताजनक असून त्यांची टेंभुर्णी येथील ग्रामीण रुग्णालयात तपासणी करून पुढील उपचारासाठी जालना येथे तातडीने हलविण्यात आले तर पहिला



अपघात नेहमीच्या ठिकाणी आपले समतोल बिघडल्याने पूर्णा नदी जवळ पोतदार इंग्लिश स्कूलसमोर एका मोटार सायकल स्वाराचे दुचाकीवरील नियंत्रण सुटल्याने मोटारसायकल मेन रोड च्या बराशी मध्ये घसरून गेल्याची घटना घडली असून दुचाकीचे मोठे नुकसान झाले असून,या अपघाताची माहिती मिळताच परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली. नागरिकांनी जखमी मोटारसायकलस्वाराला उपचारासाठी रुग्णालयात रवाना केले. दरम्यान, घटनेबाबत टेंभुर्णी पोलिस ठाण्याशी संपर्क साधला असता,त्यांनी सांगितले की, अपघातासंदर्भात अद्याप कोणतीही व्यक्ती पोलिस ठाण्यात आलेली नाही तसेच कोणतीही तक्रार दाखल झालेली नाही.

जाफ्राबाद-जालना हा प्रमुख मार्ग असून,या रस्त्यावर गेल्या दोन वर्षांत *(पान २ वर)*

## सावरगाव म्हस्केतून शेतकरी प्रश्नांवर संघर्षाचे रणशिंग

**दत्ता देशमुख**

टेंभूर्णी - शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी आणि त्यांच्या न्याय्य हक्कांसाठी संघर्ष उभारण्याचा निर्धार जाफ्राबाद तालुक्यातील सावरगाव म्हस्के येथे १४ ऑगस्ट रोजी करण्यात आला. स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे युवा प्रदेशाध्यक्ष मयुर रामेश्वर बोर्डे यांच्या नेतृत्वाखाली शेतकरी, युवक व कार्यकर्ते एकवटले असून, आगामी काळात शेतकरी प्रश्नांवर आक्रमकपणे आवाज उठविण्याचा संकल्प करण्यात आला. युवा प्रदेशाध्यक्षपदी



निवड झाल्याबद्दल मयुर बोर्डे यांचा ग्रामस्थांच्या वतीने जंगी सत्कार करण्यात आला. यावेळी युवक, शेतकरी, ज्येष्ठ नागरिक व कार्यकर्त्यांनी त्यांचे उत्स्फूर्त स्वागत केले. त्यांच्या नेतृत्वामुळे तालुक्यातील शेतकऱ्यांच्या प्रश्नांना अधिक प्रभावीपणे वाचा फोडली जाईल, असा विश्वास ग्रामस्थांनी व्यक्त केला.

सत्काराला उत्तर देताना मयुर बोर्डे यांनी शेतकरी प्रश्नांसाठी मिळालेले पद ही जबाबदारी असल्याचे सांगितले. शेतमालाला योग्य भाव, वाढता उत्पादन खर्च, वीज व पाण्याचे प्रश्न, कर्जबाजारीपणा तसेच शासन दरबारी प्रलंबित मागण्यांसाठी संघटित लढा उभारण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. सावरगाव म्हस्के येथून सुरू झालेली शेतकरी चळवळ जाफ्राबाद तालुक्यातील गावागावात पोहोचविण्याचा निर्धारही यावेळी व्यक्त करण्यात आला. निवेदने, आंदोलने, मोर्चे तसेच अन्य लोकशाही मार्गांचा अवलंब करून शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे शासनाचे लक्ष वेधण्यात येणार असल्याचे सांगण्यात *(पान २ वर)*

## वेदोक्त मंत्रोच्चारात आदर्श भगिनी मंडळाचा पार्थिव शिवलिंग पूजन, महाभिषेक सोहळा

**धूप-दीप, बेलपत्र आणि मंत्रोच्चाराने संपूर्ण परिसर बनला शिवमय**



**जालना - प्रतिनिधी**

पवित्र श्रावण महिन्याचे औचित्य साधून येथील आदर्श भगिनी मंडळाच्यावतीने मंगळवार, दि. १८ ऑगस्ट रोजी भव्य सामूहिक पार्थिव शिवलिंग पूजन व महाअभिषेक सोहळा मोठ्या भक्तिभावात आणि उत्साहात पार पडला. आदर्श भगिनी मंडळाच्या सभागृहात आयोजित या धार्मिक सोहळ्यात ४५ महिलांनी स्वतः हाताने मातीचे पार्थिव शिवलिंग तयार करून त्यांचे शास्त्रोक्त पूजन केले.

या सोहळ्याचे पौरोहित्य वे. शा. सं. नागेश गुरुजी, अमोल गुरुजी आणि भाले गुरुजी यांनी केले. यावेळी वेदमंत्रांच्या जयघोषात रुद्राभिषेक, महामृत्युंजय मंत्र जाप आणि शिव पंचाक्षरी मंत्रांचा अखंड जप करण्यात आला. धूप-दीप, बेलपत्र आणि मंत्रोच्चाराने संपूर्ण परिसर शिवमय झाला होता.

यावेळी आशीर्वाद पर बोलताना वे. शा. सं. नागेश गुरुजी म्हणाले की, श्रावण मासात पार्थिव म्हणजेच *(पान २ वर)*

## भाजपा जालना महानगर जुना जालना मंडळ अध्यक्षपदी मोहन राऊत यांची नियुक्ती

**जालना - प्रतिनिधी**

भारतीय जनता पार्टी जालना महानगर जिल्ह्यातील जुना जालना मंडळाच्या मंडळ अध्यक्षपदी श्री. मोहन रमेश राऊत यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

यावेळी भाजपा जालना महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे, प्रदेश सरचिटणीस सुनील राणे, उपमहापौर राजेश राऊत, स्थायी समिती सभापती अशोक पांगारकर, जिल्हा सरचिटणीस सुनील पवार, युवामोर्चा प्रदेश सचिव सुजित जोगस, शिवराज नारीयलवाले, नागेश अंभोरे आदींची उपस्थिती होती. या नियुक्तीबाबत भाजपा जालना महानगर जिल्हाध्यक्ष भास्करराव पाटील दानवे यांनी



श्री. मोहन रमेश राऊत यांना नियुक्तीपत्र देऊन त्यांचे अभिनंदन केले. आगामी काळात जालना महानगरातील पक्षसंघटना अधिक मजबूत करण्यासाठी तसेच पक्षाचा विचार व केंद्र व राज्य शासनाच्या विविध लोककल्याणकारी योजनांचा लाभ जनतेपर्यंत पोहोचविण्यासाठी श्री. राऊत प्रभावीपणे कार्य करतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. श्री. मोहन रमेश राऊत यांच्या नियुक्तीचे जुना जालना मंडळात भाजपा पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी स्वागत केले असून, त्यांच्या नेतृत्वाखाली मंडळातील पक्षसंघटना आणखी मजबूत होईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.




जालना जिल्हा फोटोग्राफर्स असोसिएशनच्या वतीने आज जागतिक छायाचित्र दिन साजरा करण्यात आला स्वर्गीय राजीव गांधी निवासी मूकबधिर विद्यालय घाटी रोड जालना येथे आज मूकबधिर विद्यार्थ्यांना शालेय साहित्य तसेच बिस्किट व अन्य वस्तू वाटप करण्यात आले तसेच ज्येष्ठ छायाचित्रकारांचा सत्कार करण्यात आला यावेळी ज्येष्ठ छायाचित्रकार नर्सिंग सरगम, शरद खानापुरे, राजेश खर्डेकर व लक्ष्मीकांत नारळे या जेष्ठ छायाचित्रकारांचा शाल श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला तसेच मूकबधिर विद्यार्थ्यांना शालेय साहित्य बिस्किट व इतर वस्तूंचे वाटप करण्यात आले यावेळी कार्यक्रमाचे प्रास्ताविक असोसिएशनचे अध्यक्ष अनिल व्यवहारे यांनी केले यावेळी ज्येष्ठ छायाचित्रकार शरद खानापुरे यांनी मार्गदर्शन केले या कार्यक्रमासाठी जालना जिल्हा फोटोग्राफर्स असोसिएशनचे अध्यक्ष अनिल व्यवहारे उपाध्यक्ष सोनाजी नन्नावरे सचिव मधुसूदन दंडारे, श्याम गिराम, गौतम वाघमारे, प्रशांत जीगे, विष्णू जाधव, श्याम सकुंडे, किसन थावरे, शाळेचे मुख्याध्यापक संजय गोराडे, विशेष शिक्षिका वर्षा देशमुख, युसुफ परसुवाले, व शिंपी भटू यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती होती कार्यक्रमाचे आभार शाळेचे विशेष शिक्षक युसुफ परसुवाले यांनी केले

## मोहम्मद शफीक यांच्या पुढाकारातून शिक्षकांचा सत्कार; विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप

**परतूर - प्रतिनिधी**

परतूर शहर काँग्रेसचे शहराध्यक्ष मोहम्मद शफीक यांच्या वतीने इंदिरानगर येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. एसआयआरचे काम उत्कृष्ट पद्धतीने केल्याबद्दल मो. इकबाल सर, कानपुडे सर आणि मो. रफिक सर यांचा मोहम्मद शफीक यांच्या हस्ते शाल व पुष्पहार देऊन सत्कार करण्यात आला.

यावेळी स्वातंत्र्यदिनानिमित्त शालेय विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचेही वाटप करण्यात आले. शिक्षण क्षेत्राला प्रोत्साहन देण्यासाठी आणि



विद्यार्थ्यांमध्ये शैक्षणिक आवड निर्माण करण्यासाठी मोहम्मद शफीक यांनी हा उपक्रम राबविला. सामाजिक बांधिलकी जपत शिक्षणाला प्राधान्य देणारे उपक्रम सातत्याने राबविण्याचा निर्धार मोहम्मद शफीक यांनी व्यक्त केला. त्यांच्या या उपक्रमाचे उपस्थित नागरिकांनी आणि शिक्षकांनी कौतुक केले.

या कार्यक्रमाला नगरसेवक खदीर कुरेशी, समीर शेख, अली शेख, फिरोज शेख, मुन्ना शेख, हप्पू खतीब, इमरान सय्यद, अजहर शेख, मुशर्रफ शेख आणि मज्जू शेख, जावेद शहा यांच्यासह दिलदार पठाण आदींची उपस्थिती होती.

## जलसंधारण दिनानिमित्त २१ ऑगस्टला ‘महा-वॉकॅथॉन’

‘पाणी अडवा, पाणी जिरवा, जलसंधारण जनजागृतीसाठी विशेष आयोजन; नागरिकांना सहभागी होण्याचे आवाहन

**जालना - प्रतिनिधी**

जलसंधारणाचे महत्त्व जनसामान्यांपर्यंत पोहोचविण्यासोबतच पाणी बचत, पावसाचे पाणी अडविणे व जमिनीत जिरविणे आणि जलस्रोतांचे संवर्धन याबाबत व्यापक जनजागृती करण्यासाठी २१ ऑगस्ट रोजी जलसंधारण दिनानिमित्त ‘महा-वॉकॅथॉन’चे आयोजन करण्यात आले आहे. ‘पाणी अडवा, पाणी जिरवा, जलयुक्त महाराष्ट्र घडवा!’ हा या उपक्रमाचा मुख्य संदेश असून, नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

माजी मुख्यमंत्री दिवंगत सुधाकरराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त या विशेष उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. जलसंधारण विभागाच्या माध्यमातून राज्यभर विविध जनजागृतीपर कार्यक्रम राबविण्यात येत असून, त्याचाच एक भाग म्हणून ‘महा वॉकॅथॉन वॉक फॉर वॉटर’ आयोजित करण्यात आली आहे. पाण्याचे महत्त्व, जलसंधारणाची गरज आणि भविष्यातील पाणीटंचाई टाळण्यासाठी प्रत्येक नागरिकाची भूमिका याबाबत जनजागृती करणे हा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश आहे.

**२१ ऑगस्ट रोजी वॉकॅथॉनचे आयोजन**

दि. २१ ऑगस्ट, २०२६ रोजी सकाळी ७ वाजता या वॉकॅथॉनला जिल्हाधिकारी कार्यालयापासून सुरुवात होणार असुन, घाटी - अंबड चौफुली मार्गे पोलीस मैदान परिसरात या उपक्रमाची सांगता होणार आहे. या मार्गावर सहभागी नागरिकांकडून जलसंधारणाचा संदेश जनतेपर्यंत पोहोचविण्यात येणार आहे. वॉकॅथॉनमध्ये लोकप्रतिनिधी, प्रशासनातील अधिकारी-कर्मचारी, विविध विभागांचे प्रतिनिधी, सामाजिक संस्था, स्वयंसेवी संघटना, विद्यार्थी, युवक, महिला तसेच पर्यावरण व जलसंधारण क्षेत्रात काम करणाऱ्या नागरिकांनी सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

**‘वॉक फॉर वॉटर’मधून जनजागृती**

‘ , , ’ अर्थात ‘माती वाचवा, पाणी वाचवा आणि उद्याचे भविष्य सुरक्षित करा’ असा संदेश या उपक्रमातून देण्यात येत आहे. वाढती लोकसंख्या, बदलते हवामान, अनियमित पर्जन्यमान आणि पाण्याचा वाढता वापर या पार्श्वभूमीवर जलसंधारणाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. त्यामुळे केवळ शासनाच्या योजनांवर अवलंबून न राहता नागरिकांनीही जलसंधारणाच्या कामात सक्रिय सहभाग घेण्याची गरज या उपक्रमातून अधोरेखित केली जाणार आहे. ‘पाणी अडवा, पाणी जिरवा’ या संकल्पनेनुसार पावसाचे पाणी वाहून जाऊ न देता त्याचा स्थानिक पातळीवर साठवण व पुनर्भरणासाठी उपयोग करणे, जलस्रोत स्वच्छ ठेवणे, पाण्याचा काटकसरीने वापर करणे आणि जलसंधारणाच्या कामांना लोकचळवळीचे स्वरूप देणे, हा या अभियानाचा उद्देश आहे.

**नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे**

जलसंधारण हा केवळ शासनाचा विषय नसून प्रत्येक नागरिकाच्या जीवनाशी निगडित प्रश्न आहे. त्यामुळे ‘महा- *(पान २ वर)*

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282
Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886
E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.